नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/03/2024 (शनिवार) दुपार

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
## नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक ०८/०३/२०२४ चे ०६.१५ वा. ते ०७.३० वा. दरम्यान पोलीस स्टेशन रामटेक येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, मौजा मुसेवाडी शिवार येथे ट्रॅक्टर ट्रॉली वाहनामध्ये अवैद्यरीत्या विनापरवाना रेती लोड करून जाणार आहे. अशा खात्रीशीर बातमी वरून मौजा मुसेवाडी शिवार येथे नाकाबंदी करीत असताना ट्रॅक्टर मुंडा क्र. एम.एच–४०/एल–९६०२ व निळया रंगाची विना क्रमाकांची ट्रॉली येतांना दिसली. स्टाफने वाहनांना थांबवून पाहणी केली असता वाहनामध्ये अंदाजे ०१ ब्रास रेती मिळून आल्याने सदर ट्रॅक्टर ट्रॉली चालकास वाहना मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपींच्या ताब्यातून ट्रॅक्टर मुंडा क्र. एम.एच–४०/एल–९६०२ किंमती ५०००००/– रू तसेच निळया रंगाची विना क्रमांकांची ट्रॉली किंमती १०००००/– रू विनापरवाना अंदाजे १ ब्रास रेती किंमती ३०००/– रू प्रति ब्रास प्रमाणे किंमती ३०००/– रू आणि ट्रॅक्टर भरणे करीता वापरलेले साहीत्य २ घमेले प्रत्येकी २००/– रू प्रमाणे ४००/– रू. २ फावडे किंमती प्रत्येकी १५०/– रू प्रमाणे किंमती ३००/– रू असा एकुण ६०३७००/–रूपयाचा मुद्देमाल अवैधरीत्या व विनापरवाना वाहतुक करतांना मिळुन आल्याने जप्त करून **आरोपी १) मारेश्वर संतोष उईके वय २२ वर्ष, २) रोशन गोविदा पंधरे वय १८ वर्ष ३) आकाश धनीराम सोनवाने वय १९ वर्ष तिन्ही रा. गुगलडोह ता. रामटेक** असे एकुण ०३ आरोपी यांचेविरुद्ध पोस्टे रामटेक येथे अप क्र. १९२/२०२४ कलम ३७९, ३४ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ अन्वये पो. स्टे. रामटेक येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रशांत काळे ठाणेदार पोस्टे रामटेक, पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत लांजेवारे, पोलीस हवालदार अमोल इंगोले, पोलीस नायक मंगेश सोनटक्के, पोलीस अंमलदार शरद गिते, धिरज खंते, सुभाष बावनकर यांनी केली.

**उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर यांची सावनेर उपविभागातील अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्यांविरूद्ध गुन्हा नोंद**

दि. ०९/०३/२०२४ चे पहाटे दरम्यान १४ चक्का ट्रक क्र. एम.एच. ४० सी.एम. २६९९ मध्ये १३ ब्रास रेती व ट्रक क्र. एम.एच. ४० सी. क्यु १८०४ मध्ये १३ ब्रास रेती (गौणखनिज) वाहनाचे कोणतेही मुळ कागदपत्रे न बाळगता अवैधरित्या विना रॉयल्टी चोरीचे रेतीची वाहतुक करतांना मिळुन आल्याने दोन्ही ट्रक, रेती व वेगवेगळया कंपनीचे मोबाईल असा एकुण ४१,५१,०००/– रू. जप्त करून **आरोपी नामे– १) विनोद प्रल्हाद धुळे रा. भुगाव ता. अचलपुर जि. अमरावती २) देविदास मनुजी गजाम, रा. पंढरी ता. वरूड जि. अमरावती ३) शेख नईम रा. जरूड ता. वरूड जि. अमरावती ४) राजेश प्रल्हाद धुळे रा. रा. भुगाव ता. अचलपुर जि. अमरावती ५) राजकुमार गोमाजी वाघमारे रा. सालईपुर ता. अचलपुर जि. अमरावती ६) शेख फय्याज शेख निसार, रा. जरूड ता. वरूड जि. अमरावती** यांचेविरूध्द पोलीस स्टेशन सावनेर येथे कलम ३७९, १०९, ३४ भादंवि सहकलम ४८(८) गौण खनिज अधिनियम सहकलम १३०/१७७ मोवाका सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

सदरची कार्यवाही ही श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, श्री. अनिल म्हस्के (भा.पो.से.) सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक रविंद्र मानकर ठाणेदार पो. स्टे. सावनेर, पोहवा राजेश हावरे, पोना कपोल तभाने, पोशि किशोर राठोड यांनी केलेली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर